आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
७ ऑगस्ट २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राम मंदिर देणगी अपहार आणि विद्यार्थी आंदोलनावर पोलीस कारवाईच्या मुद्द्यावरून संसदेत गदारोळ, कामकाज सोमवारपर्यंत तहकूब

- राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त देशातल्या २२ कारागीरांना राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान

- महाराष्ट्र सरकारच्या शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत ६ लाख २२ हजार शेतकऱ्यांच्या खात्यांमधे ५ हजार २९ कोटी रुपयांचा पहिला हफ्ता जमा

- पहिला 'ग्लोबल साऊथ चित्रपट महोत्सव' पुढच्या वर्षी भारतात होणार

**आणि**

- कोरिया बॅडमिंटन मास्टर्स स्पर्धेत भारताच्या रक्षिता रामराज आणि अश्मिता चालिहा यांची महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत धडक

**<><><><><>**

राम मंदिर देणगी अपहार प्रकरण आणि आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलिसांच्या कारवाईच्या मुद्द्यावरून विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे आज संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आलं. त्याआधी दोन्ही सभागृहांमधे, येत्या ९ तारखेला येणाऱ्या भारत छोडो आंदोलनाच्या चौऱ्याऐंशीव्या वर्धापन दिनानिमित्त, देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. राज्यसभेत संरक्षण, गृह मंत्रालय, वाणिज्य, आरोग्य आणि कुटुंब कल्याण या विभागांशी संबंधित संसदीय स्थायी समित्यांचे अहवाल सादर करण्यात आले.

**<><><><><>**

बारावा राष्ट्रीय हातमाग दिवस आज देशभरात साजरा करण्यात आला. ७ ऑगस्ट १९०५ रोजी भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा एक भाग म्हणून स्वदेशी चळवळ सुरू करण्यात आली. त्याची आठवण म्हणून दरवर्षी हा दिवस राष्ट्रीय हातमाग दिवस म्हणून साजरा होतो. या निमित्तानं वस्त्रोद्योग मंत्रालयानं राष्ट्रपती भवनात आज विशेष कार्यक्रम आयोजित केला

होता. या कार्यक्रमात देशभरातल्या २२ हातमाग कारागीरांना संत कबीर हातमाग पुरस्कार आणि राष्ट्रीय हातमाग पुरस्कार,  राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. २०२५ या वर्षाचा संत कबीर पुरस्कार ओडिशाच्या राम मेहेर, आसामच्या रुणिमा चौधरी आणि उत्तर प्रदेशचे शाह मोहम्मद अन्सारी यांना प्रदान करण्यात आला. हातमागाची वीण, भारताचा स्वातंत्र्यलढा आणि आत्मनिर्भरतेच्या दृष्टिकोनाशी घट्ट जुळलेली असून हे क्षेत्र भारताची असामान्य विविधता दर्शवतं असंही राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या.

**होल्ड.. बाईट - राष्ट्रपती**

देशातल्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण हातमाग विणकाम परंपरांचं स्मरण करून देणारी चार विशेष टपाल तिकिटंही या प्रसंगी जारी करण्यात आली.

**<><><><><>**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत राज्य सरकारनं आज ६ लाख २२ हजार २०७ शेतकऱ्यांच्या खात्यांमधे ५ हजार २९ कोटी रुपयांचा पहिला हफ्ता जमा केला.  कर्जमाफी योजनेच्या आढावा बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी बातमीदारांना ही माहिती दिली. पहिल्या टप्प्यात कर्जमाफीची रक्कम, तर दुसऱ्या टप्प्यात प्रोत्साहनपर रक्कम  जमा केली जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

आषाढी एकादशीला राज्य सरकारनं पहिली यादी जाहीर केली होती. त्यांच्या आधार प्रमाणीकरणाचं काम सुरू असून प्रमाणीकरण झालेल्या खात्यांमध्ये कर्जमाफी योजनेचे पैसे जमा करण्याचं सुरू झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना राज्यसभा खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी मोदी यांची प्रतिमा विणलेली विशेष 'सोलापुरी चादर' भेट दिली. ही चादर पाहून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोलापुरी विणकर बांधवांचं कौतुक केलं.

**<><><><><>**

IIT दिल्ली चा ५७ वा  दीक्षांत सोहळा उद्या होणार असून या कार्यक्रमाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत. या समारंभात पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे तीन हजारांहून अधिक विद्यार्थी तसंच ५८७ पीएच.डी. संशोधक सहभागी होणार आहेत. यावेळी उपस्थितांना प्रधानमंत्री मोदी मार्गदर्शन करणार आहेत.

<><><><><>

पहिला 'ग्लोबल साऊथ चित्रपट महोत्सव' पुढच्या वर्षी भारतात होणार असल्याची घोषणा ब्रिक्स वेव्हज बझारच्या पार्श्वभूमीवर आयोजित वार्ताहर परिषदेत आज करण्यात आली. याशिवाय NFDC, NFAI इत्यादी संस्थांनी ब्राझील, रशिया, व्हिएतनाम इत्यादी क्षेत्रातल्या संस्थांशी चित्रपट आणि मनोरंजन क्षेत्रातलं सहकार्य वाढवण्यासाठी करार केल्याची, चर्चा झाल्याची, चित्रपटांची सहनिर्मिती करण्यावर संमती झाल्याची आणि इरादापत्रांची देवाणघेवाण झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

काल मुंबईत सुरू झालेल्या दोन दिवसीय WAVES BRICS बझार उपक्रमाची आज सांगता झाली. या काळात ब्रिक्सच्या २० सदस्य देशांनी, ९०० पेक्षा जास्त प्रतिनिधींनी या उपक्रमात भाग घेतल्याची माहिती राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश मगदूम यांनी दिली. या दीड दिवसांत जवळपास २५० बैठका झाल्याचंही त्यांनी सांगितलं. विविध देशांच्या सरकारी संस्था, मनोरंजन क्षेत्राशी संबंधित व्यक्ती, गुंतवणूकदार, creators यांच्यात विचारमंथन झाल्याचंही ते म्हणाले.

<><><><><>

कोरिया बॅडमिंटन मास्टर्स स्पर्धेत आज भारताच्या रक्षिता रामराज आणि अश्मिता चालिहा यांनी महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. उपांत्यपूर्व फेरीत रक्षिताने आपलीच सहकारी तन्वी शर्माचा २१-१८, १९-२१, १९-२१ असा पराभव केला. तर, अश्मितानं अव्वल मानांकित हिना अकेची हिचा २०-२२, २१-१५, २१-१९ असा पराभव केला. आता उपांत्य फेरीत रक्षिता आणि अश्मिता यांच्यात सामना होईल.

त्यानंतर आजच्याच सत्रात, पुरुष दुहेरीत पृथ्वी कृष्णमूर्ती रॉय आणि कृष्ण प्रसाद गरग यांना मलेशियाच्या मॅन वेई चोंग आणि सोह वूई यिक या जोडीकडून पराभव पत्करावा लागल्यानं भारताचं या प्रकारातलं आव्हान संपुष्टात आलं आहे.

<><><><><>

भारत आणि श्रीलंका एकादश संघ यांच्यातल्या कसोटी क्रिकेट सामन्याला आजपासून कोलंबो इथं सुरूवात झाली. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. आज दिवसअखेर श्रीलंकेनं ८ बाद ३६३ धावा केल्या आहेत.

<><><><><>

विस्तारित संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये भारताच्या स्थायी सदस्यत्वा संदर्भात लेखी वाटाघाटी सुरू व्हाव्यात यासाठी भारत सातत्यानं पाठपुरावा करत असल्याचं आज सरकारनं लोकसभेत सांगितलं. लोकसभेत दिलेल्या लेखी उत्तरात, परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्तीवर्धन सिंह म्हणाले की, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत स्थायी आणि अस्थायी अशा दोन्ही श्रेणींचा विस्तार करण्याची आणि विकसनशील देशांना अधिक प्रतिनिधित्व देण्याची गरज भारत अधोरेखित करतो.

<><><><><>

वादग्रस्त न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या घरी मोठ्या प्रमाणात रोकड सापडल्याप्रकरणाची चौकशी न्यायालयीन देखरेखीखाली करावी तसंच या प्रकरणी एफआयआर दाखल करावा, अशी मागणी करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालायानं फेटाळली. वर्मा यांनी राजीनामा देणं पुरेसं नाही, त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोकड आढळण्याच्या अपराधावर पांघरुण घालता येणार नाही, असं याचिकेत म्हटलं होतं. वर्मा यांच्याविरुद्ध महाभियोग आला होता.

<><><><><>

तिसऱ्या मुंबईच्या विकासाला अधिक गती देण्यासाठी एमएमआरडीएचे सिंगापूरच्या टेमासेक, सुरबाना जुरोंग आणि मॅपलट्री, या तीन कंपन्यांबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत आज मुंबईत सामंजस्य करार करण्यात आले. यात मॅपलट्री कडून १०१ कोटी डॉलरची परकीय गुंतवणूक अपेक्षित आहे. त्याअंतर्गत रायगड-पेण ग्रोथ सेंटरमध्ये १०० एकरांचा जागतिक दर्जाचा मिश्र-वापर विकास प्रकल्प उभा राहणार आहे.

<><><><><>

नाशिक इथं होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याची तारीख निश्चित आहे. कुंभमेळ्याच्या ३४ हजार ७३२ कोटी रुपयांच्या विकास आरखड्यातल्या कामांना गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. ते आज सह्याद्री अतिथीगृहात नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगानं आयोजित बैठकीत बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारही उपस्थित होत्या.

<><><><><>

राज्यात खासगी शिकवणी वर्ग आणि महाविद्यालयांमध्ये संगनमतानं एकीकृत पद्धतीनं शिक्षण सुरू असल्याची टीका मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली आहे. ते आज नाशिक इथं बातमीदारांशी बोलत होते. शिकवणी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची हजेरी महाविद्यालयाच्या तासात कशी लागते, याकडे मुख्यमंत्री आणि उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्र्यांनी लक्ष द्यायला हवं, असं ते म्हणाले.

नाशिकमध्ये यापूर्वी दोन कुंभमेळे झाले आहेत, मात्र त्यावेळी उभारण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधांचा त्रास नागरिकांना झाला नव्हता. यंदा खड्ड्यांमुळेच अनेकांचा बळी गेल्याची टीका त्यांनी यावेळी केली.

//<><><><><>//